मच्छिमार साधनांवर अर्थसहाय्य.
लहान मच्छिमारांसाठी अर्थसहाय्यात सुधारणा

**महाराष्ट्र शासन**
**कृषि व सहकार विभाग,**
**शासन निर्णय क्रमांकः-मत्स्यम-१६८१/३९०३१/१२/पदुम**
**मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांकः- ९ सप्टेंबर १९८२.**

पहाः- मत्स्यव्यवसाय संचालकांचे मत्स्यवि/२६६-८१/७ मावे,दि.२०.१०.१९८१ चे पत्र.

**निर्णयः-** आर्थिकदृष्टया अत्यंत दुर्बळ घटक असलेल्या लहान मच्छिमारांना रापणकरांना पुरेश्या प्रमाणात अर्थसहाय्य देऊन त्यांना मत्स्योत्पादन वाढविण्यास व स्वतःची आर्थिक स्थिती सुधारण्यास प्रोत्साहन देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. सदरहू अर्थसहाय्याचा लाभ पारंपरागत पध्दतीने मासेमारी करणाऱ्या लहान मासेमारांना व पंजीबध्द संस्था नसलेल्या रापणकरांना मिळावयाचा आहे. सदरहू अर्थसहाय्याच्या खाली नमूद केलेल्या दोन योजनांस शासनाची मान्यता देण्यात येत आहे अर्थसहाय्याच्या अटी व शर्ती सोबत जोडल्या आहेत.
अर्थसहाय्याच्या अटी व शर्ती सोबत जोडल्या आहेत.

१) रापणकरांना मच्छिमारीच्या साधनांवर अर्थसहाय्य.

| | |
|---|---|
| २) नायलॉन सत | सूताच्या किंमतीच्या १५ टक्के. |
| ३) फिलामेंट किंवा मोनोफिलामेंट सिंथेटिक. | सूताच्या किंमतीच्या १५ टक्के. |
| ४) शेव सूत | सूताच्या किंमतीच्या २५ टक्के. |

हे अनुदान रापण संघाच्या प्रत्येक सभासदाला प्रतिवर्षी ३० किलो या मर्यादेपर्यंत - राहील. -

२) बिगर यांत्रिक नौकांसाठी लहान मासेमारांना अर्थसहाय्यः-

१)१० टनापर्यंत बिगर यांत्रिकी नौका (तिच्या वापरासाठी आवश्यक असलेल्या शिड, वल्ही, नांगर व दोर यांसह) बांधण्याकरिता किंवा तयार नौका खरेदी करण्यासाठी रांपणकारांना किंवा लहान मच्छिमारांना बोटीच्या किंमतीच्या ५० टक्के अथवा रु.३०,०००/- यापैकी जे कमी असेल ते अनुदान शासनामार्फत देण्यात येईल. मात्र हे अनुदान प्राप्त करण्यासाठी अनुदान घेऊ इच्छिणारा मासेमार/रापणकर हा सहकारी संस्थेचा सभासद असला पाहिजे.

२) उर्वरित रक्कम बँकेकडून कर्ज रुपाने उपलब्ध करुन घ्यावयाची आहे.

३) बँकेकडून घेतलेल्या कर्जापोटी बँकेचा प्रचलित व्याज दरात दर व द.सा.द.शे रु.४/- प्रमाणे व्याज दर यामधील फरका एवढे व्याज अनुदान म्हणून शासनाकडून बँकेस देण्यात येईल.

२) सदर अनुदानासाठी येणारा खर्च २१२-मत्स्यव्यवसाय जे इतर खर्च (२) पंचवार्षिक योजनेअंतर्गत योजना-(२)(१) मत्स्यव्यवसायाकरिता आवश्यक साधनांच्या पुरवठा हया अर्थशिर्षाखाली नोंदवावा व शासन ज्ञापन वित्त विभाग क्र.सी.एन.एफ ११८२/१३६/बीयुडी-१४ दि.०२.९.१९८२ अन्वये मंजूर झालेल्या (रु.२०,०००/-च्या) आकस्मिक निधीतून भागवावा.

३) मत्स्यव्यवसाय संचालक, मुंबई यांनी विधान सभेच्या पुढील अधिवेशनात सादर आकस्मिक निधीची पूर्तता करण्यासाठी पूरक मागणी सादर करावी.

४) हे आदेश वित्त विभागाच्या अनुमतीने त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.८१९/ईएक्सपी-१४,दि.२२.८.८१ अन्वये निर्गमित होत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने. -

सही/-
रा.स.मुंगारे -
सहाय्यक सचिव, महाराष्ट्र शासन, -
कृषि व सहकार विभाग

प्रति,
मत्स्यव्यवसाय संचालक, मुंबई
प्रादेशिक मत्स्यव्यवसाय संचालक, मुंबई
सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक मुंबई/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/ठाणे(पालघर)
वित्त विभाग/नियोजन विभाग
महालेखापाल, महाराष्ट्र (१) मुंबई
जिल्हा कोषागार अधिकारी ठाणे/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग
कार्यकारी संचालक,
महाराष्ट्र राज्य मच्छिमार सहाकारी संघ, महात्मा फुले मार्केट, मुंबई
कार्यकारी संचालक,
ठाणे जिल्हा मच्छिमार सहकारी संघ ठाणे
कार्यकारी संचालक, रायगड जिल्हा मच्छिमार सहकारी संघ अलिबाग
कार्यकारी संचालक, रत्नागिरी जिल्हा मच्छिमार सहकारी संघ अलिबाग
कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मुंबई
कार्यकारी संचालक, मुंबई जिल्हा सहकारी बँक लिमिटेड
कार्यकारी संचालक, ठाणे जिल्हा सहाकारी बँक ठाणे

कार्यकारी संचालक, रायगड जिल्हा सहकारी बँक अलिबाग
कार्यकारी संचालक, रत्नागिरी जिल्हा सहकारी बँक रत्नागिरी

## परिशिष्ट अ

## रापणकरांना मच्छिमारीच्या साधनांवर अर्थसहाय्य

१) रापण संघाच्या प्रत्येक सदस्याला प्रतिवर्षी एकूण ३० किलो मर्यादेपर्यंत सूत खरेदीवर अनुदान मिळेल. नायलॉन व मोनोफिलामेंट सुतावर खरेदी किंमतीच्या १५ टक्के व शेवसूतावर २५ टक्के या दराने अनुदान देण्यात येईल.

२) रांपण संघानी आपल्या संघाचे नांव त्या संघातील सदस्यांची नांवे व त्यांचे संपूर्ण पत्ते दरवर्षी एप्रिल महिन्यात/त्यांचे जिल्हयातील सहकारी मच्छिमारी संस्थांना कळवावीत. मत्स्यव्यवसाय विभागच्या जिल्हा कार्यालयात नोंद झालेल्या संघाना/सभासदांनाच या योजनेचा फायदा मिळेल, संघातील सदस्यांच्या नावांने/संख्येत बदल झाल्यास तो बदल झाल्यापासून एक महिन्यात जिल्हा कार्यालयाला कळवावा. मात्र कोणत्याही परिस्थितीत त्या वर्गाच्या सुरक्षातील कळविलेल्या सभासद संस्थेच्या मर्यादेपर्यंतच त्यावर्षी अनुदान देण्यात येईल. रांपण संघ/संघातील सभासद संख्या, त्यात झालेला बदल याबाबत उपरोक्त अर्थसहाय्याबाबतचा निर्णय सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक देतील.

३) सुत खरेदी स्थानिक मासेमार सहकारी संघ अथवा जिल्हा मच्छिमार सहकारी संघाकडून करावी. सदरहू संस्थांना रांपणकारांना हवे असलेले सूत पुरविण्यासाठी अडचणी असल्यास रापण संघाने तालुका अगर जिल्हयाच्या ठिकाणी सुत विक्रीचा व्यवसाय करणाऱ्या विक्रेत्याकडून सुत खरेदी केली तरी चालेल. सदर सूत खरेदीच्या पावत्या संबंधीत रांपण संघाच्या शिफारशीसह जिल्हा मत्स्यव्यवसाय कार्यालयाकडे अनुदान मंजूरीसाठी सादर कराव्यात.

४) सूत खरेदीच्या पावत्या खरेदीच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आंत जिल्हा कार्यालयास सादर कराव्यात. एका संघास एका आर्थिक वर्षात जास्तीत जास्त तीन वेळा अनुदानासाठी प्रस्ताव पाठविता येतील.

५) अनुदानाची मंजूर रक्कम जिल्हा कार्यालयाकडून संघाचे नांवे बँक हप्त्याने धाडण्यात येइल व त्याची पोंच पावती संघाने दयावी तसेच संघाचे सदस्यांना अनुदानाची रक्कम पोचल्याच्या त्यांचेकडून घेतलेल्या पावत्या जिल्हा कार्यालयास अनुदानाची रककम मिळाल्यापासून १ महिन्याच्या आंत पाठवाव्यात. तसे न केल्यास सदरहू संघाने अनुदानासाठी पाठविलेले नवीन प्रस्ताव विचारात घेण्यात येणार नाहीत व त्याची जबाबदारी संघावर राहील.

६) ज्या सदस्यांची विभागाकडून घेतलेल्या कर्ज रक्कमेच्या देय हप्त्यांची रक्कम येणे असेल ती त्यांना मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून वळती करुन घेण्यात येईल.

७)	एका व्यक्तिीस संबंधित अनुदानाचा लाभ वर्षातून एकदाच घेता येईल. तो एकाच संघातून मिळेल. सर्व सदस्यांना लाभ मिळेल व एकच व्यक्ति एकाहून अधिक संघातून लाभ घेणार नाही हे पाहण्याची जबाबदारी संबंधीत रापंण संघावर राहील.

## परिशिष्ट ब

## बिगर यांत्रिक नौकांसाठी लहान मासेमारांना अर्थसहाय्य

**प्रस्ताविकः-**

सदर अर्थसहाय्याच्या प्रधान हेतू गरीब मच्छिमारांना बिगर यांत्रिक नौकांसाठी अनुदान मिळावे हा आहे असे अनुदान मिळत असल्यामुळे मच्छिमारांना बँकेकडून कर्ज मिळणे सोपे जाईल.

**अनुदानः-**

१० टनापर्यंत (कौलावरील टनेज) असलेल्या बिगरयांत्रिक नौका (तिच्या वापरासाठी आवश्यक असलेल्या भांगर यासह) बांधण्याकरिता किंवा तयार नौका येण्याकरिता खालीलप्रमाणे अर्थसहाय्य अनुज्ञेय राहिल. (जाळयांसाठी अर्थसहाय्य मिळणार नाही).

**अनुदानाचे प्रमाणः-**

१) शासनाचे अनुदान किंमतीच्या ५० टक्के अथवा रु.३०,०००/- यापैकी जे कमी आहेत ते .
२) बँकेकडून घेतलेल्या कर्जाची नियमित फेड केल्यास तशी बँकेने शिफारस केल्यास ते बँकेच्या सामान्य व्याज दर व द.सा.द.शे रु.४/- दर या नवीन किरकोळ व्याज अनुदान शासनाकडून मिळेल.

अर्थसहाय्य मिळण्यासाठी आवश्यक बाबीः-

१) अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न एकात्मिक ग्रामीण विकास योजनेमार्फत अनुदान मिळाल्यास पात्र उत्पन्न मर्यादेपर्यंत असावे.
२) अर्जदारांनी पूर्वी यांत्रिक संस्था बिगर यांत्रिक नौकांसाठी अनुदानाचा लाभ घेतलेला नसावा, असल्यास त्याच्या हिश्याची अनुदानाची रक्कम परत करावी.
३) तसेच अर्जदाराने मत्स्यव्यवसाय विभागाकडून घेतलेले सर्व कर्ज व्याजासह चुकते केलेले असावे.

अर्थसहाय्य मिळविण्याची पध्दतः-

अर्जदाराने आपल्या अर्जाच्या ३ प्रती संबंधीत मच्छिमार सहकारी संस्थांच्या शिफारशीसह - विकासशील जिल्हा मत्स्यव्यवसाय विकास अधिकाऱ्यांकडे सादर कराव्यात. सदर अर्जासोबत खालील

कागदपत्रे पाठवावित. अर्जात नौका व अन्य साधनांसाठी किती रक्कम लागणार आहे व कर्ज कोणत्या बँकेकडून येणार याचा तपशील दयावा.

अ) संबंधित तालुक्यातील तहसिलदार अथवा गट विकास अधिकारी अर्जदाराच्या एकूण उत्पन्नाचा दाखला दर्शविणारे पमाणपत्र.

ब ) संस्थेचा सभासद व मच्छिमार असल्यासंबंधीचा संस्थेचा दाखला.

क) नौका बांधणीचा करारनामा

ड) शीड, वल्ही, नांगर, दोर यांची निविदा

या अर्जाची संबंधित जिल्हा मत्स्यव्यवसाय कार्यालय अधिकारी आवक दिनांकानुसार नोंदवहीत नोंद येतील.

जिल्हा कार्यालय अधिकारी उपलब्ध निधी, अर्जाचा प्राथ्यम क्रमांक तो विभागाचा थकबाकीदार नाही इत्यादी गोष्टी लक्षात घेवून अर्जदारांनी नमूद केलेल्या बँकेकडे अर्जाची शिफारस करतील. अशी शिफारस करताना संबंधित कार्यालय बँकेच्या नजरेस विभागातर्फे किती अनुदान देण्यात येईल एवढेच नमूद करील व तसे अर्जदाराला कळवील. बँकेकडून कर्ज मिळविण्याची जबाबदारी अर्जदारावर राहील.

अटीः-

१) अनुदान प्राप्त बिगर यांत्रिक नौका अनुदान दिल्यापासून सात वर्षाच्या कालावधीत हस्तांतरीत किंवा विकता येणार नाहीत.
२) अशा नौकांनवर सात वर्षे होईपर्यंत इंजिन बसविता येणार नाही.
३) इंजिन बसविणे झाल्यास खात्याची पूर्व परवानगी घ्यावी लागेल त्या इंजिनवर अनुदान मिळणार नाही या अटी मान्य असल्यास करारनामा अर्जदारांनी अनुदान घेण्यापूर्वी स्टँप पेपरवर करुन दयावा.

अनुदानाचे वितरणः-

१) किंमतीच्या ५० टक्के किंवा रु.३०,०००/- यापैंकी जी कमी असेल ती अनुदानाची रक्कम नौका बांधणीसाठी ज्या बँकेकडून कर्ज घेतले जाणार आहे त्या बँकेने कर्ज मंजूर

केल्यावर ज्या सहकारी संस्थेमार्फत अर्ज असेल त्या सहकारी संस्थेच्या नावे जिल्हा बँकेत जमा करण्यात येईल.

२) अर्जदारांनी प्रतिवर्षी बँकेच्या कर्जाचे हप्ते तसेच व्याज नियमितपणे बँकेकडे भरणा करावेत. सदरहू कर्जांवरील ४ टक्के दराने होणारी व्याजाची रक्कम बँकेने कर्जदाराकडून प्रतिवर्षी वसूल करावी. व नियमित दराप्रमाणे होणारी उर्वरित व्याज रक्कम चुकती करण्यासाठी बँकेचे संबंधित जिल्हा कार्यालयास आपले मागणी पत्र वर्षअखेर पाठवावेत. त्यानुसार व्याज अनुदानाची रक्कम बँकेकडे भरणा करण्यांत येईल.